गुन्हेगारी-घटनेस वाचा फोडुन झुंज देणारे एकमेव दैनिक

# दैनिक झुंजार जनता

R.N.I. No.MAHMAR/2022/82590 Mo. 8180068180

वर्ष :३ रे | अंक २१४ | शुक्रवार दि. ०९ मे २०२५ | पाने ४ | किमत ४ रु | POSTAL Reg.No.CSN/RNP/537/2024-2026


**सुविचार**

अहिंसा ही मानवतेसाठी सर्वात मोठी शक्ती आहे, ती मनुष्याने तयार केलेल्या विनाशातील शक्तिशाली शस्त्रापेक्षा अधिक शक्तिशाली आहेत

## BSF ची कमाल! भारतावरील मोठ्या हल्ल्याचा कट उधळला; सांबा सेक्टरमध्ये 7 दहशतवाद्यांचा खात्मा

दैनिक झुंजार जनता

: ऑपरेशन सिंदूरनंतर (Operation Sindoor) थयथयाट करणाऱ्या पारिस्ताननं अखेर जे अपेक्षित होतं तेच केलं. भारतीय सीमाभागातून पाकिस्ताननं हल्ला करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या या प्रयत्नांना भारतानं जमिनीवर आपटून प्रत्युत्तर दिलं. इथं पाकिस्तानकडून सतत कटकारस्थानं रचत भारतावर हल्ल्याचे प्रयत्न सुरु असतानाच तिथं सांबा सीमेनजीक दहशवाद्यांकडून घुसखोरीचा प्रयत्न करण्यात आला. सांबाच्या सीमेवरून जैश-ए-मोहम्मदचे दहशतवादी घुसखोरीच्या प्रयत्नांत असतानाच बीएसएफनं त्यांचे हे प्रयत्न हाणून पाडले. सूत्रांच्या माहितीनुसार पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणा आयएसआयच्या इशाऱ्यानुसार जवळपास 10 ते 12 दहशतवादी सांबा सेक्टरमधील आंतरराष्ट्रीय सीमेवरून भारतामध्ये घुसखोरी करण्याच्या प्रयत्नांत होते. याचदरम्यान बीएसएफच्या पेट्रोलिंग टीमनं क्षणात ही घुसखोरी ओळखत 7 दहशतवाद्यांचा खात्मा केला. आयएसआयच्या इशाऱ्यानंतर भारतात घुसखोरी करत एक मोठा हल्ला घडवण्याच्या मनसुब्यानं हे दहशतवादी सीमा ओलांडू पाहत होते. त्यामुळं बीएसएफची ही कारवाई आताच्या क्षणाला अतिशय महत्त्वाची कारवाई ठरत आहे.

ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्ताननं भारतावर हल्ले करण्याचे प्रयत्न केले खरे. मात्र हे सर्व हल्ले भारतानं उधळून लावले. एकिकडून भारतीय सैन्यदल, दुसरीकडून वायुसेना आणि तिथं सागरी मार्गानं भारतीय नौदलानं पाकिस्तानची कोंडी केली. देशाच्या सीमा भागांमध्ये बीएसेफनं मोहिम उचलून धरली आणि शत्रू राष्ट्राची घुसखोरी हाणून पाडली. एकंदरच शक्य त्या सर्व बाजूंनी भारतीय लष्कराच्या प्रत्यके तुकडीनं पाकिस्तानवर आघात केला. भारतानं केलेल्या हल्ल्यांचं उत्तर देत पाकिस्ताननंही देशावर क्षेपणास्त्रांनी हल्ला केला. यामुळं शत्रू राष्ट्रामध्ये हाहाकार माजला आणि पुन्हा एकदा पाकिस्तानचा खोटा आत्मविश्वास कोलमडला. भारतीय वायुदलानं पाकची लढाऊ विमानं हवेतल्या हवेतच नष्ट केली, तर पाकच्या 3 वैमानिकांना युद्धबंदी करण्यात आलं. यामध्ये JF-17 च्या पायलटचाही समावेश असल्याचं वृत्त समोर येत आहे.

## लाहोर, सियालकोट, कराची अन् इस्लामाबादेत भारताचा हल्ला;

# स्फोटांनी पाकिस्तान हादरलं

दैनिक झुंजार जनता

**जम्मू** - पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानेऑपरेशन सिंदूर हाती घेत पाकिस्तानातील ९ दहशतवादी ठिकाणांवर टार्गेट हल्ला केला. या हल्ल्यात १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले. भारताच्या हल्ल्यानंतर बिथरलेल्या पाकिस्ताननं गुरुवारी रात्री ९ वाजल्यापासून भारताच्या अनेक शहरात ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न केला. परंतु भारतीय सैन्याने S400 या एअर डिफेन्स यंत्रणेने हे सर्व हल्ले परतवून लावले. पाकिस्तानची ८ मिसाईल उद्ध्वस्त केली. त्याशिवाय पाकिस्तानचे लढाऊ विमान JF17, F-16 याला भारताने प्रतिहल्ला करून जमिनीवर पाडले.पाकिस्तानच्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतानेही आक्रमक पवित्रा घेत पाकच्या अनेक शहरांवर हल्ले केले. भारताने लाहोर, सियालकोट, कराची आणि पाकची राजधानी इस्लामाबादमध्येही गोळे फेकले. भारताने पाकिस्तानचे एअरबोर्न वॉर्निंग अँन्ड कंट्रोल सिस्टम उडवले. भारताने पाकच्या सर्व हल्ल्यांना जशास तसे उत्तर दिले. भारत-पाकिस्तान यांच्यातील तणाव पाहता १० देशांसोबत भारतीय परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी चर्चा केली. पाककडून केलेल्या हल्ल्याला भारत उत्तर देणार अशी माहिती जयशंकर यांनी दिली आहे.

पाकिस्तानकडून होणारे हल्ले पाहता सीमाभागातील राज्यांमध्ये ब्लॅकआऊट करण्यात आले होते. जम्मूच्या आरएसपुरा येथे सातत्याने सायरन वाजत होता. सध्या जम्मू



शहरात मोबाईल नेटवर्क सुरू नाही. सतवारी कॅम्पमध्येही पाकिस्तानने ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न केला. कुपवाडा येथेही जोरदार गोळीबारी सुरू होती. पुंछ आणि राजौरीमध्येही पाकिस्तानच्या हल्ल्याचा प्रयत्न भारतीय सैन्याने उधळून लावला. भारतीय वायू रक्षा तंत्रज्ञानाने अनेक महत्त्वाच्या शहरांवरील हल्ले अयशस्वी केले. पाकिस्तानी मिसाईल, ड्रोन यांना हवेतच उद्ध्वस्त करण्यात आले. भारताने जम्मू ते जैसलमेरपर्यंत पाकिस्तानी भ्याड हल्ल्यांना सडेतोड उत्तर दिले. जम्मू काश्मीरच्या सांबा जिल्ह्यात गुरुवारी रात्री ११ च्या सुमारास पाकिस्तानकडून घुसखोरीचा प्रयत्न केला गेला मात्र सीमा सुरक्षा दलाने हा प्रयत्न हाणून पाडला. पाकिस्तानच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देत भारतीय सैन्यानेही पाकिस्तानच्या अनेक शहरांमध्ये हल्ला केला. इस्लामाबादमधील पाकिस्तानी सैन्य प्रवक्ते जनरल अहमद शरीफ यांनी लाहोर, गुजरांवाला, चकवाल, बहावलपूर, मियानो, कराची, छोर, रावलपिंडी आणि अटक इथं भारतीय ड्रोनने हल्ला केल्याची पुष्टी केली.


# महालिंगीत पाण्यासाठी नागरिकांची भटकंती ...

## जलजीवन मिशनचा भोंगळ कारभारामुळे नागरीक त्रस्त..

दैनिक झुंजार जनता

**हिंगोली जिल्हा प्रतिनिधी गुणाजी चाकोते :-**

कळमनुरी तालुक्यातील महालिंगी या गावात अनेक वर्षापासून भीषण पाणीटंचाईचा सामना गावकऱ्यांना जवळपास वीस वर्षापासून संघर्ष सुरू आहे परंतु आज पर्यंत सुद्धा प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची ठोस उपाययोजना करण्यात आली नसल्याने नागरिकात प्रचंड असंतोष पसरला आहे मात्र यावर प्रशासन मुद्दामून डोळेझाक करत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. महालिंगी हे गाव आदिवासी बहुल असुन या शासनाने पाणीटंचाई निवारण्यासाठी गावांत मोठ्या थाटामाटा जलजीवन योजनेअंतर्गत पाणीपुरवठा करण्याची योजना अंमलात आणली परंतु त्या ठिकाणी भ्रष्टाचाराने बरबटलेल्या प्रशासनाकडून अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम होत आहे,पण वरिष्ठ अधिकारी व संबंधित प्रशासन या कामाकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष करत असल्यामुळे या कामाचा सुरू होण्याच्या अगोदरच बट्ट्याबोळ होण्याच्या मार्गावर परिस्थिती येऊन ठेपली आहे... "आधा तुम्हारा ...आधा हमारा" या नियमाप्रमाणे गुत्तेदार व अधिकारी यांच्या मिलीभगत असल्यामुळे गावकऱ्यांना हक्काच्या पाण्यापासून आजही वंचित राहण्याची दुर्दैवी वेळ आली आहे .हर घर जल या उपक्रमांतर्गत जलजीवन मिशन योजनेच्या माध्यमातून महालिंगी येथे नळ योजनेचे काम सुरू आहे पण या नळाद्वारे कधी पाणी मिळेल का...? या भाबड्या आशेवर येथील गावकरी थांबले आहेत परंतु यावर्षीचा उन्हाळा संपत आला तरी लोकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. दाभडी,महालिंगी व महालिंगी तांडा असे तिन गाव मिळुन ग्रामपंचायत असलेल्या या महलिंगी गावात अर्ध गाव तुपाशी व अर्ध गाव उपाशी अशी अवस्था गावात झाली आहे आणी सर्व पाईपलाईन अर्ध्या फुटावर असल्याने वारंवार लिक होत असल्याने हजारो लिटर पाणी वाया जात.तसेच महालिंगी तांडा येथील पाण्याच्या टाकीचे काम सुध्दा अर्धवटच या कामाकडे अभियंता यांचे लक्ष नाही मे महिना चालु झाला तरी काम पुर्ण नाही. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.



"गावात काही ठिकाणी पाणी आहे, आणि काही ठिकाणी नाही यात हि मुद्दाम मागासवर्गीय लोक राहणाऱ्या लोकांना पाण्यासाठी मुद्दामहून दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास येत आहे त्यातही प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे अर्धे गाव तुपाशी आणि अर्धे गाव उपाशी म्हणण्याची पाळी गावकऱ्यावर आली आहे म्हणून पाण्याची सुयोग्य नियोजन लावावे अशी मागणी आता जोर धरू लागली आहे अन्यथा लोकशाही मार्गाने मोठे जन आंदोलन छेडण्याचा इशारा गावकऱ्यामार्फत देण्यात आला आहे.

## यावल तालुक्यात चुंचाळे येथे आज अनोखा गुरू शिष्य पुण्यतिथी सोहळा.

## ११ क्विंटल आंब्याचा रस आणि ५ क्विंटल पुरणपोळीचा महाप्रसाद.

दैनिक झुंजार जनता

यावल दि.८ ( सुरेश पाटील ) तालुक्यातील चुंचाळे येथे गुरू रघुनाथ बाबा व शिष्य वासुदेव बाबा हे एकाच दिवशी वैशाख शुद्ध बारस या तिथीला समाधिस्त झाले होते तेव्हा पासुन गुरू व शिष्य पुण्यतिथीचा अनोखा सोहळा शुक्रवार दि.९ मे २०२५ रोजी श्री समर्थ वासुदेव बाबा दरबारात होणार आहे श्री समर्थ सुकनाथ बाबा हे काशी येथुन भ्रमण करीत चुंचाळे येथे आले आणि बारा वर्ष अखंड तप केले म्हणून तेव्हा पासुन चुंचाळे या गावाला श्री समर्थ सुकनाथ बाबा यांची तपभुमी म्हणून ओळखली जाते त्यानंतर त्यांचे शिष्य व चिरंजीव श्री समर्थ रघुनाथ बाबा यांचा जन्म चुंचाळे येथे झाला म्हणून त्यांची जन्मभुमी म्हणून हे ओळखले जाते या पिता पुत्राच्या समाधीचे स्थान ( वर्डी ता.चोपडा ) येथे आहे.सुकनाथ बाबा १९३५ मध्ये तर रघुनाथ बाबा १९७९ मध्ये ( वर्डी ता.चोपडा ) येथे समाधिस्त झाले त्यानंतर श्री समर्थ वासुदेव बाबा हे रघुनाथ बाबा सोबत राहत होते. वासुदेव बाबा हे चुंचाळे गावात १९८० मध्ये आले त्यांनी ग्रामस्थ व शिष्यांना सहकार्याने गावात भव्य मदिर बांधण्यास प्रारंभ केला सुकनाथ बाबांच्या कथनाप्रमाणे मदिरा ला विट लावली तेव्हाच पासुन गावातील घराचे देखील बाधकाम सुरू झाले त्यानंतर १९८९ मध्ये श्री रघुनाथ बाबा यांच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा केली तर श्री समर्थ सुकनाथ बाबा यांच्या २१ किलो चांदीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सन २००० मध्ये करण्यात आली या मदिरा चा कळस ६१ फुट उंचीचा आहे श्री समर्थ वासुदेव बाबा हे नेहमीच वैशाख शुद्ध बारसाला त्यांचे गुरू श्री समर्थ रघुनाथ बाबा यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम करतात आपल्या गुरूची पुण्यतिथी सोहळा मी नसतानाही सुरू राहायला पाहिजे म्हणून गुरूच्या पुण्यतिथीच्या दिवशी वासुदेव बाबा चुंचाळे येथे समाधिस्त झाले असा हा गुरु शिष्य पुण्यतिथीचा सोहळा वासुदेव बाबा दरबारात मोठया उत्साहाने केला जातो असा तयार होतो महाप्रसाद एक दिवस अगोदर मंदिर परिसरातील व गावातील महिला पिठ तयार करुन ठेवतात व रात्री आठ वाजेपासून सर्व महिला पुरणपोळी तयार करण्यासाठी मंदिराजवळ येतात आंब्याचा रस सकाळी मशिनरी द्वारे तयार करण्यात येतो सोबत मसाली रसी सुद्धा केली जाते असा होईल कार्यक्रम सकाळी ६ ला मारोती अभिषेक ६.३० ला श्री समर्थ सुकनाथ बाबा यांच्या मूर्तीला स्नान व मूर्ती अभिषेक ६.३० आरती ८.३० पासुन भजन भारूडांना सुरूवात होईल दुपारी १२ ला महाआरती होऊन १ वाजेपासुन महाप्रसादाला सुरूवात होईल असे आवाहन चुंचाळे ग्रामस्थानी केले आहे



## भाजपाच्या पैठण शहर मंडळाच्या शहराध्यक्ष पदी बंडु आंधळे यांची निवड...

दैनिक झुंजार जनता

पैठण प्रतिनिधी : भाजपाचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे तसेच कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस व माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वामध्ये पार पडलेल्या तसेच निवडणूक अधिकारी सर्जेराव मेटे व तालुका अध्यक्ष लक्ष्मण पाटील औटे, उपजिल्हाध्यक्ष भाऊसाहेब काळे,माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे यांच्या उपस्थितीत भाजपाच्या पैठण शहर मंडळाच्या शहराध्यक्ष पदाच्या निवडीमध्ये शहराध्यक्ष पदी बंडु आंधळे यांची निवड करण्यात आली आहे.बंडु आंधळे यांच्या निवडीबद्दल



तालुकाअध्यक्ष लक्ष्मण औटे, माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे, रेखाताई कुलकर्णी, अश्विनीताई लखमले, शहराध्यक्ष सिद्धार्थ परदेशी, उपतालुका अध्यक्ष सुरेश गायकवाड, विजय चाटूपळे, आशिष मापारी, लक्ष्मीकांत पसारे, रमेश पाठक, सुरज घुले, शिवाजी तुपे, सुनील वीर, लहू गायकवाड, आकाश कुलथे, ज्ञानेश्वर दहिवाळ, कैलास बरकसे, गणी बागवान, विजय आचार्य, समीर शुक्ला, प्रशांत आव्हाड,प्रेम जाधव, निखिल गुप्ता, रोहन चव्हाण, कृष्णा नाचन,नवीन गुप्ता, धोंडीराम वाघ, देविदास शेळके, प्रतीक नागरे, महाराणा,रीक्षा युनियन, श्याम पंचवानी, संदीप लोहारे, विशाल पैलवान, संदेश मुथा, ॲड.कल्याण बाबर, विशाल पोहेकर, वैभव पोहेकर, सुभाष सोनटक्के अदिंनी अभिनंदन केले.

# गोद्री येथे घाणीचे साम्राज्य गावातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात

## ग्रामपंचायतचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष

दैनिक झुंजार जनता

**जालना प्रतिनिधी-जावेदखा पठाण**

भोकरदन तालुक्यातील गोद्री येथे घाणीचे साम्राज्य पसरल्याने गावातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.नाली अभावी प्रत्येकांच्या घरासमोर ठिकठिकाणी पाणी साचल्याने काही ठिकाणी तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. तसेच स्वच्छता केवळ नावाला राहिली असल्याचे चित्र दिसून येत आहे.गावात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरल्याने साथीचे रोग पसरत आहे.अनेक नागरीकांना साथीच्या आजारांना तोंड द्यावे लागत आहे. भविष्यात नागरीकांना गंभीर आजार



होण्याची भितीही व्यक्त होत आहे. याकडे ग्रामपंचायत जाणिवपूर्वक दुर्लक्ष करतांना दिसत आहे.प्रत्येक गल्लीत जागोजागी कचरा व पाण्याचे डबके साचले असून,नाल्या तूंबलेल्या आहेत . नागरीकांना रस्त्यावर चालणे कठीण झाले असून दुर्गंधीही सुटल्याने मोठा त्रास सहन करावा लागत आहे. घाणीमुळे नागरीकांना साथीच्या आजारांना सामोरे जावे लागत आहे.ग्रामपंचायतीच्या दर्लक्षामुळे साथीच्या आजारांना निमंत्रण मिळत असल्याने याचे दुष्परिणाम मात्र गावातील जनतेला भोगावे लागत आहे.वरिष्ठांनी याकडे तात्काळ लक्ष घालावे अशी मागणी ग्रामस्थांनाकडून होत आहे.

# भारतानं पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरातील ९ दहशतवादी तळांवर हवाई हल्ला

## महिलांनी एकमेकांना सिंदूर लावून भारतमातेचा जयघोष केला

दैनिक झुंजार जनता

पैठण प्रतिनिधी :- २२ एप्रिल रोजी झालेल्या व मानवतेला कलंक फासणा-या पहलगाम हल्ल्याचे प्रत्युत्तर म्हणून भारतानं पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरातील ९ दहशतवादी तळांवर हवाई हल्ला करून ते उध्वस्त केले. या ऑपरेशनचं नाव सिंदूर आहे... ज्या भगिनीचा सिंदूर जिहाद्यांनी पुसला त्याच सिंदुरचा हिशोब समस्त देशवासियांना विश्वासात घेऊन भारतीय सेनेने व भारत सरकारने मांडला आहे . विशेष म्हणजे या कारवाईनंतर देशवासी व संपूर्ण जगाला यांची माहिती देण्यासाठी जगासमोर उभ्या होत्या कर्नल सोफिया कुरेशी व विंग कमांडर व्योमिका सिंह या दोन महिला . देशाच्या एकतेचे हे प्रतीक आहे. आणि संदेश आहे की भारताकडे वाकड्या नजरेने बघण्याची परत हिंमत कराल तर काय स्थिती होईल हे लक्षात ठेवावे.या क्षणाचा जल्लोष व भावना व्यक्त करण्यासाठी आज संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान,पैठणकर महिला व नागरिक, श्री क्षेत्र पैठण येथील संत एकनाथ महाराज यांच्या मंदिरात एकत्र येऊन पुजनानंतर भारतमातेचा जयघोष केला. आमच्या कपाळी असणाऱ्या चिमुटभर सिंदुरने आज जगाला ताकद दाखवून दिली.हाच सिंदुर आम्ही एकमेकींना लावला. भारतीय



सेना,भारत सरकार व देशाचे नेतृत्व यावर आमचा पुर्ण विश्वास आहे व आम्ही भारतीय नारी आहोत याचा अभिमान आहे. पंतप्रधान मोदींजींचे कणखर निर्णयासाठी खुप खुप आभार व्यक्त केले. या प्रसंगी रेखाताई कुलकर्णी,राखी परदेशी, वैशाली पाटील,मंजु सारडा , योगिता काटे,उल्का पालखी वाले ,अपुर्वा पालखी वाले, सुप्रिया गोसावी, मीना वैद्य, वैशाली दाणेकर, इंदू ढाकणे,बबीता वाघमोडे, कल्पना सर्जे , रोहिणी कुलकर्णी, वंदना सारडा, माधुरी पांडव, सुनीता करवा,यांसह असंख्य महिला व देशप्रेमी नागरिक उपस्थित होते.

## झाडांवर क्रूरता स्वीकार्य नाही

### एंड आकाश सपेलकर, सर्वोच्च न्यायालय -दिल्ली -वकील

देशात सुरू असलेल्या बेकायदेशीर वृक्षतोडीविरुद्ध कडक भूमिका घेत सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, झाड तोडणे हे माणसाला मारण्यापेक्षाही वाईट आहे. न्यायालयाने आरोपींना नवीन झाडे लावण्याची परवानगी दिली परंतु तोडलेल्या ४५४ झाडांसाठी प्रति झाड १ लाख रुपयांचा दंड कमी करण्यास नकार दिला. आरोपीने आपली चूक कबूल करून आणि माफी मागितल्यानंतरही न्यायालयाने हे केले. याद्वारे न्यायालयाने पर्यावरणाचे नुकसान करणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश दिला. खरं तर, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय एस ओका आणि न्यायमूर्ती उज्जल भुईयान यांच्या खंडपीठाने स्पष्ट संदेश दिला की संबंधित प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय झाडे तोडणाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. ताजमहाल आणि इतर पुरातत्वीय इमारतींच्या संवर्धनासाठी तयार करण्यात आलेल्या ताज ट्रॅपेझियम परिसरात ४५४ झाडे तोडण्यात आली हे उल्लेखनीय आहे. खरं तर, न्यायालयाने या प्रकरणात ॲमिकस क्युरी म्हणून मदत करणारे वरिष्ठ वकील एडीएन राव यांच्या सूचनेला सहमती दर्शवली की कोणीही कायदा आणि वृक्षांना हलके घेऊ नये. त्याच वेळी, दंड आकारण्याच्या बाबतीत, न्यायालयाने एक मानक निश्चित केले की यामध्ये कोणतीही सवलत दिली जाणार नाही. तोडलेल्या झाडांच्या जागी नवीन झाडे लावली तरी त्याची भरपाई करण्यासाठी शंभर वर्षे लागतील, अशी चिंताही न्यायालयाने व्यक्त केली.

हे उल्लेखनीय आहे की न्यायालयाने २०१५ पासून पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असलेल्या ताज ट्रॅपेझियम परिसरात झाडे तोडण्यास बंदी घातली होती. तरीही, न्यायालयाच्या परवानगीशिवाय शेकडो झाडे तोडण्यात आली. त्यानंतर न्यायालयाने केंद्रीय सक्षम समिती म्हणजेच सीईसीचा अहवाल स्वीकारला की गेल्या वर्षी ४५४ झाडे तोडणाऱ्या व्यक्तीला प्रति झाड १ लाख रुपये दंड आकारण्यात यावा. आरोपीने आपली चूक कबूल केली आहे आणि माफी मागितली आहे, त्यामुळे दंड कमी करून त्याला दिलासा देण्यात यावा, असा आरोपीच्या वतीने उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांचा युक्तिवाद न्यायालयाने फेटाळून लावला. तथापि, न्यायालयाने जवळच्या काही ठिकाणी झाडे लावण्याची परवानगी दिली आहे. जगभरातील जागतिक तापमानवाढीमुळे तापमान सतत वाढत असताना, झाडांची उपस्थिती हा ऑक्सिजनचा एकमेव स्रोत आहे. जे शहरांच्या काँक्रीटच्या जंगलामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांपासून आपले रक्षण करते. त्यांची दुहेरी भूमिका आहे, विशेषतः पुरातत्वीयदृष्ट्या महत्त्वाच्या क्षेत्रात. अशा परिस्थितीत, धोरणकर्त्यांना विचार करावा लागेल की एखाद्या व्यक्तीला संवेदनशील क्षेत्रात झाडे तोडण्याची परवानगी कशी देण्यात आली. सतत वाढत्या तापमानाच्या युगात, समाजात तसेच सरकार आणि प्रशासनात झाडांप्रती संवेदनशीलता असायला हवी. आपण उत्तराखंडमधील चिपको आंदोलन आणि राजस्थानमधील खेजरी वृक्ष वाचवण्यासाठी लोकांचे बलिदान आणि संघर्ष लक्षात ठेवले पाहिजे. झाडे वाचवण्यात जनतेचा तीव्र प्रतिकार देखील निर्णायक भूमिका बजावू शकतो.

संपूर्ण देशात रस्ते बांधणीचे काम जोरात सुरू असल्याचे दिसून येते. प्रत्येक राज्यात, सर्वात प्रगतीशील विभाग म्हणजे रस्ते वाहतूक आणि महामार्ग विभाग जिथे महामार्ग बांधणीसाठी दररोज हजारो झाडे तोडली जात आहेत. याबद्दल फारशी जागरूकता नाही. झाडे तोडणे ही आपली सक्ती असू शकते पण त्याच प्रकारे झाडे लावणे ही देखील आपली जबाबदारी आहे.



Aakash Sapelkar
ADVOCATE
SUPREME COURT OF INDIA

## शिधापत्रिका ऑनलाईन नसल्याने उपचारापासून रुग्ण कोसो दूर

### उपचाराचे पत्र देण्यासाठी रुग्ण चक्क पुरवठा विभागाच्या दारातच झोपला

दैनिक झुंजार जनता

**गंगापूर** : एकीकडे शासनाकडून नागरिकांना विविध गंभीर आजाराची लागण झाल्यास रुग्णालयात मोफत उपचार मिळावेत म्हणून अनेक योजना जाहीर करत आहे. परंतु रुग्णांना मोफत उपचार करण्यासाठी रुग्णालयाकडून प्रथम शिधापत्रिकाची मागणी केली जात आहे. मात्र अनेक नागरिकांच्या शिधापत्रिका ऑनलाइन नाही.शिधापत्रिका ऑनलाईन नसल्याने पुरवठा विभागाकडून उपचार करण्यासाठी लागणारे पत्र दिले जात नसल्याने गंभीर आजार असलेल्या रुग्णांना मोफत उपचारापासून कोसो दूर राहावे लागत आहे.

गंगापूर तालुक्यात विविध गावात अनेक नागरिकांच्या शिधापत्रिका ऑनलाइन नसल्याने ऑनलाइन करण्यासाठी पुरवठा विभागाचे उंबरठे झीजवावे लागत असून पुरवठा



विभागाकडून ऑनलाइनची साईट बंद असल्याचे सांगितले जात आहे. ऑनलाइनची साईट ची दुरुस्ती करून नागरिकांच्या शिधापत्रिका ऑनलाईन करुन द्यावे व रुग्णांना रुग्णालयात मोफत उपचारासाठी गरज असलेल्या पत्राची पुरवठा विभागाने त्वरित रुग्णांना ऊपलब्ध करून देण्याची मागणी नागरिक व रुग्णांकडून होत आहे.

तालुक्यात लोकप्रतीनीधीं व पुरवठा विभागाकडून नागरिकांना शिधापत्रिका देण्यात आल्या. मात्र काही शिधापत्रिका ऑनलाईन नसल्याने नागरिकांना याचा काहीच उपयोग होत नाही. स्वस्त धान्य दुकानदाराकडून धान्यही मिळत नाही. शिधापत्रिका ऑनलाईन नसल्याने शिधापत्रिकाधारकांच्या घरातील व्यक्ती आजारी पडून गंभीर आजार झाल्यास यासाठी पुरवठा विभागाकडून एक पत्राची आवश्यकता असते. शिधापत्रिका ऑनलाईन नसल्याने पुरवठा विभाग पत्र देण्यास टाळाटाळ करत आहे.

असाच एक प्रकार गंगापूर तहसील कार्यालयातील पुरवठा विभागासमोर घडला. तालुक्यातील वाहेगांव येथील एक कॅन्सरग्रस्त रुग्ण शिधापत्रिका ऑनलाईन करून द्यावे व उपचारासाठी एक पत्र देण्यात यावे म्हणून चक्क गंगापूर येथील तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाच्या दारासमोरच झोपला. मला रुग्णालयात उपचार करण्यासाठी पुरवठा विभागाकडून पत्रच मिळत नसल्याने मग रुग्णालयात मरण्याऐवजी येथेच मेलेले बरे असे रुग्णाने पुरवठा विभागाच्या संबंधितांना सांगत होता. पुरवठा विभागाच्या दारासमोरच हा रुग्ण उपचाराची संचिका घेऊन झोपी गेला आहे. मात्र याबाबत संबंधितांना कोणतेही गांभीर्य नसल्याने केवळ पुरवठा विभागाच्या एका पत्रासाठी रुग्णांना उपचार करण्याऐवजी उपचारासाठी पत्र देता का हो असे टाहो फोडावे लागत असून दररोज पुरवठा विभागाचे उंबरठे झीजवावे जवावे लागत आहे.

### ... तर आंदोलन करणार

**तालुक्यात अनेक नागरिकांच्या शिधापत्रिका ऑनलाईन नाही. ऑनलाइन नाही म्हणून गंभीर आजार असलेल्या रुग्णांना रुग्णालयात उपचार करण्यासाठी लागत असलेल्या पत्राची पुरवठा विभागाकडून ऑनलाइन साईट बंद असल्याचे कारण दिले जात नसुन यामुळे सर्व सामान्य रुग्णांना मोफत उपचारापासून मुकावे लागत आहे. ऑनलाइन नसलेल्या शिधापत्रिकाच्या शोध घेऊन या शिधापत्रिका तात्काळ ऑनलाईन करून रुग्णांना उपचार करण्यासाठी पत्राची आवश्यक असल्यास त्वरित उपलब्ध करून न दिल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करणार असल्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.**

## साहित्य संमेलनात डझनभर लेखकांच्या पुस्तकांचे प्रकाशन

दैनिक झुंजार जनता

**वडाळा महादेव** : काव्यगंध साहित्य मंच व काव्यगंध प्रकाशनाच्यावतीने शिर्डी येथे दुसरे राज्यस्तरीय साहित्य संमेलन लातूरचे ज्येष्ठ साहित्यिक भारत सातपुते यांच्या अध्यक्षतेखाली आणि गझलकार रज्जाक शेख, व्याख्याते अमोल चिने, नवनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झाले. संमेलनात डझनभर लेखकांच्या आकर्षक व दर्जेदार पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.त्यात सुवर्णा वाणी-सुवर्णदीप, सुमन मुठे-चांदणं प्रभा, ऋता भामरे-मन चांदणे, स्वाती आफळे -स्वाती मोती, गणेश पवार -सेल्फ से स्क्रीन तक, जी. बी. खिल्लारे -नवोदय, ॲड. वंदना जाधव -अवतार, विलास बाबर -काव्य वर्षाविलास, गणपत तरंगे-मनाच्या काठावर,




ओंजळ शब्द फुलांची, अशोक गुट्टे -काव्य दर्पण, व्यंकनबाई चेनलवाड-काव्यानंद, संजय महाजन-विमल काव्य, नामदेव घुले-वादळ, तसेच शेकडो कवींच्या शब्दगंध, काव्यगंध या प्रातिनिधिक काव्यसंग्रहांचाही यावेळी प्रकाशन समारंभ झाला. यावेळी अध्यक्ष भारत सातपुते, रज्जाक शेख, अमोल चिने यांनी मनोगते व्यक्त केली. संयोजनात संस्थापिका व प्रशासक प्रमुख नागपूरच्या ॲड. अक्षशीला शिंदे, अहिल्यानगरचे अध्यक्ष प्रशांत गोरे, स्थानिकचे पदाधिकारी डॉ. धनंजय जगताप, अर्जुन गायकवाड यांच्यासह अनेकांनी नियोजनांसाठी परिश्रम घेतले. दिवसभराच्या या साहित्यिक कार्यक्रमास राज्यभरातून शंभरपेक्षा जास्त साहित्यिक, अवतीभवतीच्या परिसरातील रसिक, पत्रकार उपस्थित होते.

## अर्ज द्या, कर्ज घ्या मोहीम प्रभावीपणे राबवावी : आ. बंब

दैनिक झुंजार जनता

**गंगापूर** : खरीप हंगामाअगोदर शेतकऱ्यांना पीककर्ज, बियाणे व खतांचा पुरवठा, वीजपुरवठा तसेच वेळेत पीककर्ज उपलब्धता करण्यासाठी अर्ज द्या, कर्ज घ्या मोहीम राबवावी. पीककर्ज नाकारणाऱ्या बँकांवर गुन्हे दाखल करणार. सर्व विभागाच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी मुख्यालयी राहणे बांधनकारकच असून कोणत्याही परिस्थितीत मुख्यालयी राहावे असे प्रतिपादन आमदार प्रशांत बंब यांनी केले. शहरातील एका खाजगी मंगल कार्यालयात खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीत आ. बंब बोलत होते.

उपविभागीय अधिकारी अरुण जराड, अधीक्षक अभियंता वीणा सावंत, तहसीलदार नवनाथ वगवाड, पोलीस निरीक्षक कुमार सिंग राठोड, गटविकास अधिकारी सुहास वाकचौरे, प्रकाश नाईक, कार्यकारी अभियंता भूषण पोहरकर, प्रकाश देशमुख, जिल्हा अधीक्षक प्रकाश देशमुख, कृषी अधिकारी तर घरी जाल. शेतकऱ्यांकडे जर एखाद्या अधिकाऱ्याने पैसे मागितले त्याची तक्रार करण्याचे आवाहन त्यांनी केले. त्या अधिकाऱ्यावर गंभीर स्वरूपाची



प्रकाश पाटील, उपविभागीय कृषी अधिकारी किरण विरकर, तालुका कृषी अधिकारी, बापूराव जायभाय, ज्ञानेश्वर तारगे, पुरवठा विभागाच्या नायब तहसीलदार कांचन कांबळे, गटशिक्षणाधिकारी समाधान आराख, अनिल भगत उपस्थित होते.

बैठकीत ओव्हर लोड, जळीत रोहित्र लोंबकळत असलेल्या वीज तारा, आरडीएसएस योजना, सोलार ई. बाबत आढावा घेण्यात आला. शेतकऱ्यांना पुढील एक महिना कमीत कमी लोडशेडिंग व अखंडित वीजपुरवठा करा. अधिकाऱ्यांनी खोटी माहिती, चुकीची माहिती देणे, माहिती लपवणे ही गंभीर बाब आहे. हे खपवून घेणार नाही. कोणी रोहित्र जळाले किंवा जळालेल्या रोहित्र बसवण्यासाठी पैसे मागितले कारवाई करण्यात येईल, असा इशारा आ. बंब यांनी दिला.

यावेळी नंदकुमार गांधीले, भाजपा तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण, सुरेश राऊत, अमोल जाधव, प्रदीप पाटील, मारुती खैरे, भागेश गंगवाल, भाऊसाहेब पदार, सचिन काकडे, नवनाथ सुराशे, दीपक बडे, कृष्णा सुकाशे, रज्जाक पठाण, गोपाल वर्मा, अमित मुदडा, कृष्णकांत व्यवहारे, भारत पाटील, आप्पासाहेब हिवाळे, राकेश कळसकर, राजू मोरे, हाशम पटेल, संजय पांडव, प्रशांत मुळे, अतुल रासकर, सर्व बँकेचे व्यवस्थापक, ग्रामपंचायत अधिकारी, महसूल अधिकारी, कृषी सहाय्यक, वीज वितरणचे अधिकारी, सरपंच, उपसरपंच, शेतकरी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## परिश्रम ज्युनिअर कॉलेज बारावीचा निकाल ९३.७५ टक्के

दैनिक झुंजार जनता

**शेवगाव** :केदारेश्वर ग्रामीण विकास प्रतिष्ठान संगमनेर संचलित परिश्रम ज्युनिअर कॉलेज राक्षी या कॉलेजचा बारावी सायन्स परीक्षेचा निकाल ९३.७५ ७टक्के लागला असून प्रथम क्रमांकाने अथर्व दिनेश राठी ८३.६७टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाला आहे तसेच कॉलेजमध्ये द्वितीय क्रमांक कुमारी भराडी जानवी प्रीतम ८२.८३ टक्के गुण प्राप्त झालेले आहेत. या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एकनाथराव ढाकणे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत ढाकणे, विश्वस्त ऋषिकेश ढाकणे, सचिव जया रहाणे, प्राचार्य सुनील अवताडे तसेच डॉ. आर. एच. अत्तार , डोंगरे अंबादास ,प्लेसमेंट ऑफिसर महेश मरकड यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे परिश्रम ज्युनिअर कॉलेज विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी यशस्वी उपक्रम राबवत असून विद्यार्थी यशस्वी उत्तीर्ण व्हावी यासाठी अभ्यासक्रम पूर्ण करण्यात येऊन वैयक्तिक पातळीवर लक्ष दिल्यामुळे संस्थेचा निकाल छान लागला आहे असे उद्गार डॉक्टर एकनाथराव ढाकणे यांनी काढले आहे चालू आर्थिक वर्षात सुद्धा संस्थेत अकरावी व बारावी सायन्स करिता विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा असे आवाहन कॉलेजच्या वतीने करण्यात आलेले आहे सुसज्ज इमारत शिक्षक आणि प्रॅक्टिकल साठी प्रयोगशाळा खेळासाठी मैदान आधी सेवा सुविधा परिश्रम ज्युनिअर कॉलेजच्या माध्यमातून राक्षी तालुका शेवगाव या ठिकाणी उपलब्ध केलेल्या आहे.

## विखे महाविद्यालयाच्या १०२ विद्यार्थ्यांना विविध बँकांमध्ये नोकरीची संधी

दैनिक झुंजार जनता

**लोणी** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ग्रामीण भागातील उत्कृष्ठ महाविद्यालय म्हणून तिसऱ्यांदा गौरविलेल्या लोणी येथील पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयामध्ये नुकत्याच एच.डी.एफ.सी. बँक, कोटक महेंद्रा या नामांकित बँकांच्यावतीने परिसर मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. या मुलाखतीमध्ये १०२ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणात नोकरीची संधी मिळणे ही अतिशय अभिमानास्पद बाब असल्याचे महाविद्यालयाचे कॅम्प संचालक डॉ. आर.ए. पवार यांनी सांगितले.संस्थेचे अध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नोकरी आणि स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा यासाठी महाविद्यालयाच्या माध्यमातून विशेष प्रयत्न होत आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच कौशल्य आधारीत प्रशिक्षणे त्याचबरोबर पुस्तकी ज्ञानाबरोबरच ग्रामीण विद्यार्थी हा परिपूर्ण व्हावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रवरा स्पर्धा परीक्षा केंद्र प्रक्षेत्र भेटी, प्रत्यक्ष कृती डरे शिक्षण, विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांना बदलत्या शिक्षणाचा आणि औद्योगिक क्षेत्रात आवश्यक असणाऱ्या कौशल्यांची माहिती दिली जाते. कमवा शिकवा योजना आणि विविध शिष्यवृत्ती या माध्यमातून शिक्षणासाठी पाठबळ दिले जाते यामुळे आज ग्रामीण विद्यार्थी हा प्रवरेच्या माध्यमातून अव्वल स्थानावर आहे. याशिवाय माजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून देखील वेळोवेळी आवश्यक असलेली माहिती त्यांना उपलब्ध होत असल्याने नोकरीची मोठी संधी या महाविद्यालयांमध्ये निर्माण झाली आहे. महाविद्यालय आणि संस्था पातळीवरती विविध सामजस्य करार असल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी हे आज शहरी भागामध्ये चांगल्या प्रकारची नोकरी करून आपली स्वप्ने पूर्ण करीत करीत आहे, असे पवार यांनी सांगितले. मुलाखती यशस्वी करण्यासाठी संस्थेचे ट्रेनिंग व प्लेसमेंट सेलचे कन्व्हेनर प्रा. मनोज परजणे, महाविद्यालयाचे ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाचे डॉ. हरिभाऊ डुबे, एकनाथ सरोदे, अप्पासाहेब शेळके यांनी परिश्रम घेतले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे पाटील, माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील, अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे पाटील, सहसचिव भारत घोगरे पाटील, संस्थेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक डॉ. प्रदिप दिघे यांनी अभिनंदन केले आहे.


## रयतची प्रत्येक शाळा आता जगाच्या एक पाऊल पुढे : चंद्रकांत दळवी

दैनिक झुंजार जनता

**श्रीरामपूर** : येत्या शैक्षणिक वर्षापासून कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, आयवोटी, रोबोटिक्स, थ्रीडी प्रिंटिग यासारख्या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याला जागतिक दर्जाच्या विषयांचे शिक्षण देण्यासाठी रयत शिक्षण संस्था सज्ज आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत दळवी यांनी केले.

यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स कॉलेज सातारा येथे पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ६६ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण परिषदेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. यावेळी रयत शिक्षण संस्थेत केलेले महत्वपूर्ण बदल सांगताना ते म्हणाले की, यापुढे रयत शिक्षण संस्थेच्या प्रत्येक शाळेच्या इमारतीचा रंगदेखील एकसारखाच असेल. रंगाचा आता मब्रँडफ असेल. रयत शिक्षण संस्थेतील मुख्याध्यापक शिक्षकांना अद्ययावत ज्ञानाची माहिती होण्यासाठी मरयतफ मासिक सुरु करण्यात येत आहे. याच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन येत्या ९ मे रोजी होईल. नवनियुक्त मुख्याध्यापक तसेच क्लार्क यांना अकाउंट लेखणाच्या मार्गदर्शनासाठी पुस्तिका तयार करण्यात आली आहे. शाळांच्या विकासात माजी विद्यार्थीदेखील योगदान देत असतात. शाळेच्या विकासात माजी विद्यार्थ्यांचे योगदान घेण्याच्या दृष्टीने माजी विद्यार्थी संघ रजिस्ट्रेशन करण्यात येईल.

कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे सचिव विकास देशमुख, विभागीय अधिकारी, सहाय्यक विभागीय अधिकारी तसेच रयत शिक्षण संस्थेच्या सुमारे सहाशेहून अधिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक उपस्थित होते.





## मस्तक ठीक होण्यासाठी पुस्तक वाचण्याची गरज : सरोदे

### पिचडगाव येथे शब्दगंधच्या फिरत्या वाचनालयाचे उत्स्फूर्त स्वागत

दैनिक झुंजार जनता

**नेवासा** : तालुक्यातील पिचडगाव येथे शब्दगंध साहित्य परिषदेच्या फिरते वाचनालय उपक्रमाचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यावेळी गावकऱ्यांनी एकत्रित येऊन विविध पुस्तके हाताळली व ती वाचली.

आजच्या धकाधकीच्या जीवनात आपण पुस्तकाला हात लावीत नाही. कारण आपण सर्व मोबाईलच्या आधिन झालो आहोत. खरंतर वाचन संस्कृती हा फार मोठा विषय आहे. मस्तक ठीक होण्यासाठी आज प्रत्येकाने पुस्तक वाचण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी सदस्य दिलीपराव सरोदे यांनी केले

पिचडगाव येथे शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य नेवासा शाखेने आयोजित केलेल्या फिरते मोफत वाचनालय उपक्रमात ते बोलत होते. ते म्हणाले की लेखकांनी पुस्तक खूप अभ्यासपूर्वक लिहिलेली असतात. म्हणून लोकांनी ते वाचली




पाहिजेत. जोपर्यंत आपण पुस्तक हातात घेत नाही तोपर्यंत मेंदूला चालना मिळत नाही आणि म्हणून तुमच्या हातात पुस्तक आणून देण्याचे काम शब्दगंध साहित्यिक परिषदेने केले आहे.

प्रारंभी शब्दगंध नेवासा शाखेचे उपाध्यक्ष शिवशाहीर दिगंबर गोंधळी यांनी संबळ वाद्य वाजून वातावरण निर्मिती केली. शाखेचे सल्लागार माजी कुलगुरू व माजी प्राचार्य कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोकराव ढगे यांनी फिरते मोफत वाचनालय उपक्रमाच्या उद्देश स्पष्ट केला. दुसरे सल्लागार प्रा. डॉक्टर दिगंबर सोनवणे यांनी पुस्तक वाचण्याचे महत्त्व व मोबाईलच्या वाढत्या वापराचे दुष्परिणाम स्पष्ट करून यावर पुस्तक वाचन हा एकमेव उपाय असल्याचे सांगून विविध पुस्तके वाचण्यास घेण्याचे अवाहन केले.

उपक्रमाचे पिचडगाव हे २४ वे गाव असल्याचे शब्दगंध नेवासा शाखेचे अध्यक्ष प्राध्यापक डॉ. किशोर धनवटे यांनी सांगितले व वाचनाचे फायदे स्पष्ट केले. याप्रसंगी राजेंद्र गिऱ्हे, सीताराम गव्हाणे, लहानू गव्हाणे, जगदीश शेजूळ, शशिकांत बनसोडे, शंकर गव्हाणे, छबुराव माळी, साहेबराव गव्हाणे, काशिनाथ गव्हाणे, दिलीप नवघरे, साखरबाई बनसोडे, अशोक मकासरे, गणेश टिळेकर, संदीप गिऱ्हे, दत्तात्रय हजारे, गैतम बनसोडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

द • ख • ल

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बारामती येथे स्वागत

दैनिक झुंजार जनता

**बारामती, :** अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी येथे होत असलेल्या राज्य



मंत्रीपरिषद बैठकीकरीता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बारामती विमानतळ येथे आगमन झाले. यावेळी उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर यांनी प्रशासनाच्यावतीने त्यांचे स्वागत केले. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, 'एमआयडीसी'चे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, बारामतीचे तहसीलदार गणेश शिंदे, इंदापुरचे तहसीलदार जीवन बनसोडे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम आदी उपस्थित होते.

## घरफोडी ; १ लाख ८८ हजारांचा ऐवज चोरी

दैनिक झुंजार जनता

**निरगुडसर** - महाळुंगे पडवळ ता. आंबेगाव या ठिकाणी सुभाष आत्माराम पडवळ वय ६७ यांच्या घरात चोरी झाल्याची घटना दि.५ मे रोजी रात्री १० ते दि.६ मे रोजी पहाटे ६ वाजताचे दरम्यान घरफोडी घडली. अज्ञात चोरट्यांनी बंद घराचा कडी कोयंडा, कुलूप तोडून घरात प्रवेश करत कपाटाचा दरवाजा उचकटून कपाटातील ६३ हजार रुपये रोख रक्कम, ५० हजारांची सोन्याची अंगठी, २५ हजाराची कानातील वेल, १० हजार रुपयांची सोन्याची नथ, ४० हजार रुपये किमतीची चांदीची साखळी व चांदीच्या पट्ट्या, असा एकूण १ लाख ८८ हजार रुपयांच्या मुद्देमाल चोरून नेला आहे. याबाबत सुभाष पडवळ यांनी मंचर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## रायरेश्वरसाठी मंत्री शिवेंद्रराजे भोसलेंना भोरकरांची आर्त हाक

दैनिक झुंजार जनता

**भोर :** रायरेश्वर (ता .भोर) येथे छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतल्याने या परिसराला ऐतिहासिक महत्व आहे.मात्र अति पर्जन्यमान परिसर असल्याने सध्या किल्ल्यावर (पठार)जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे.परिणामी ऐतिहासिक परिसराला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या कमी झाली आहे. या पार्श्वभूमीवर आम्ही भोरकर प्रतिष्ठानचे पदाधिकारी समीर घोडेकर यांनी सुनील कोळेकर, राहुल कोपरकर यांचेसह राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांची नुकतीच भेट घेतली होती. तसेच किल्ल्यावर जाणाऱ्या कोर्ले ते रायरेश्वर (ता.भोर )रस्त्याची दुरुस्ती आणि काँक्रीटीकरण करण्याची मागणी केली होती.याप्रमाणे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला संबंधित रस्त्याचे अंदाज पत्रक तयार करण्याचे निर्देश दिले होते.त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग उपविभागीय कार्यालय सासवड यांनी ६ कोटी ३८ लाख रुपयांचे अंदाजपत्रक तयार केल्याचे समीर घोडेकर यांनी (दि.७) सांगितले.



सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचेशी चर्चा करताना समीर घोडेकर(छाया – विक्रम शिंदे)

## महाराष्ट्र ऊस उत्पादक संघाच्या राज्य संचालकपदी साहेबराव खामकर

दैनिक झुंजार जनता



**पुणे :** शेतक-यांचे ऊस उत्पादन वाढीसाठी सदैव कार्य करणारे संपूर्ण राज्याचे कार्यक्षेत्र असलेल्या महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादक संघाचे राज्य संचालकपदी नुकतीच नवदीप सोशल फाउंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष व साखर उद्योगाचे अभ्यासक साहेबराव खामकर यांची नुकतीच निवड करण्यात आली. संघामार्फत ऊस उत्पादकता वाढीच्या दृष्टीने शेतक-यांना नियमित मार्गदर्शन केले जाते. खामकर यांचा साखर कारखान्यातील अनुभव व अभ्यास लक्षात घेऊन त्यांची राज्य संचालकपदी निवड केल्याचे संघाचे संस्थापक अध्यक्ष अतुल माने पाटील यांनी सांगितले. संघामार्फत एकरी १०० टन ऊस उत्पादन अभियान, महाराष्ट्र ऊस भूषण कार्यगौरव पुरस्कार, जमीनआरोग्य व्यवस्थापन, मशागत, बेणे लागवड, बेणे प्रक्रिया, आंतरपीक व्यवस्थापन, खत व्यवस्थापन, ठिबक सिंचन, ऊस तोडणी व्यवस्थापन अशा विविध विषयांवर राज्यातील वेगवेगळ्या भागात उपक्रम राबविण्यात येतात. ऊस हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे नगदी पीक असून या पिकामुळे राज्याची आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक प्रगती होण्यास मदत झाली आहे. शेतक-यांचे ऊज्वल भविष्यासाठी ऊस पीकाची ऊत्पादकता वाढविणे गरजेचे असल्याने संघ प्रयत्नशील आहे. या करीता खामकर यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरणार असल्याचे माने यांनी सांगितले. या पदावर निवड झाल्याबद्दल खामकर यांचे भीमा पाटस कारखान्याचे माजी संचालक धनजीभाई शेळके, पुणे वकील संघटनेचे माजी अध्यक्ष ॲड.संतोष खामकर, माजी कार्यकारी संचालक तात्यासाहेब निकम तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे .

> गेल्या काही वर्षापासून ऊस क्षेत्रातील आपल्या अनुभवाचा जास्तीत जास्त फायदा शेतक-यांना होण्याच्या दृष्टीने नेहमीच प्रयत्नशील राहणार आहे.
> साहेबराव खामकर, ऊस अभ्यासक, पुणे

# कुणबी जात प्रमाणपत्रांसाठी नेमलेल्या तहसीलदारांच्या समितीला ३० जूनपर्यंत मुदतवाढ

दैनिक झुंजार जनता

**पुणे** राज्यातील मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी काही जिल्ह्यांत वंशावळ जुळविण्याचे काम अद्याप अपूर्ण असल्याने तहसीलदारांच्या अध्यक्षतेखालील वंशावळ समितीला राज्य सरकारने ३० जूनपर्यंत मुदतवाढ दिली आहे. यामुळे ज्यांना अजून प्रमाणपत्रे मिळाली नाहीत, त्यांना ती मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. राज्यातील मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये आवश्यक पुराव्यांची वैधानिक व प्रशासकीय तपासणी करण्यासाठी माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. त्यानुसार कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र देण्यासाठी वंशावळ जुळविण्यासाठी तालुकास्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे. राज्य सरकारने शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीस ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या समितीच्या आढावा बैठकीमध्ये शिंदे यांनी राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये वंशावळी जुळविण्याचे कामकाज अद्याप पूर्ण झालेले नसल्यामुळे तालुकास्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या वंशावळ समितीसही ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार या समितीला मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आता या समितीला मुदतवाढ मिळाल्याने अद्याप प्रमाणपत्र न मिळालेल्यांना ते मिळण्याची शक्यता निर्माण झाली असून, अनेकांना दिलासा मिळाला आहे. राज्यात आतापर्यंत ५८ लाख ७७ हजार ९९३ कुणबी नोंदी सापडल्या आहेत. या नोंदींच्या आधारे आठ लाख २५ हजार ८५१ कुणबी जात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहेत. शिंदे समितीच्या चौथ्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे.

## पाण्याची चोरी, तीन महिन्यात ९ हजार अनधिकृत नळ कनेक्शन

दैनिक झुंजार जनता

**पिंपरी :** महापालिका हद्दीत पिण्याच्या पाण्याची मोठ्या प्रमाणात चोरी होत आहे. अनेकांनी अनधिकृत नळजोडणी करत पाण्याचा वापर सुरू केल्याचे स्पष्ट होत आहे; कारण शहरात दररोज ६३० एमएलडी पाण्याचा पुरवठा करूनही तो अपुरा व कमी दाबाने होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे महापालिकेकडून भोसरी, चिंचवड आणि पिंपरीत घरोघरी नळ कनेक्शन सर्वेक्षण सुरू आहे. यामध्ये तीन महिन्यांत सुमारे ९५०० नळ कनेक्शन नधिकृत आढळून आली आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून शहरात बोगस नळ कनेक्शनधारकांची शोधमोहीम सुरू आहे. महापालिका हद्दीतील आठही प्रभागांत घरोघरी प्रत्येक नळ कनेक्शनची पाहणी करण्यात येत आहे. नळ कनेक्शन अनधिकृत असेल नळजोडणी अधिकृत केली ात आहे. प्रत्येक ठिकाणी स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहे. त्यामुळे ाणीवापराचे प्रमाण कमी होऊन बिल अचूक होण्यास मदत होणार आहे. महापालिकेच्या स्मार्ट सिटी योजनेतून यापूर्वी ९२६८ नळ जोडण्यांना स्मार्ट वॉटर मीटर बसविण्यात आले. मात्र, आणखी एक लाख साठ हजार जोडण्यांना स्मार्ट वॉटर मीटर बसविले गेली नाहीत. हा सगळा खर्च १४०

कोटींवर जाणार आहे. आता असे मीटर बसवण्याची मोहीम सुरू केली आहे. मीटरमुळे पाणीगळती रोखण्यास मदत होणार आहे. शहरात समन्यायी पद्धतीने पाणीपुरवठा व्हावा, याकरिता पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने सुपरवायजरी कंट्रोल अँड डाटा ॲक्विझिशन (स्काडा) प्रणाली सुरू केली, तरीही तब्बल ४० टक्के पाण्याची गळती व चोरी होत आहे. त्याचा शोध घेण्यात स्काडा प्रणालीला यश आलेले नाही. पाणीपुरवठा व्यवस्थापन अधिक सक्षम व नियोजनपूर्वक करण्यासाठी यापूर्वी स्मार्ट सिटी कंपनीने शहरातील ९२६८ नळांना स्मार्ट वॉटर मीटर बसविले आहेत. हे मीटर मोठ्या हाऊसिंग सोसायट्या, बंगलो व उच्चभ्रू वस्ती, तसेच जेथून मीटर

चोरीला जाणार नाहीत, त्याची नासधूस होणार नाही, अशा भागांत बसविण्यात आले आहेत.

## ओबीसी व्ही.जे.एन.टी. शिवसेना सेल दक्षिण जिल्हाध्यक्षपदी काका शेळके

दैनिक झुंजार जनता



**अहिल्यानगर** - शिवसेना पक्षाचे प्रमुख व राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्या आदेशाने व शिवसेना सचिव संजय मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ओबीसी व्हि. जे.एन.टी.सेना अहिल्यानगर दक्षिण जिल्ह्याच्या अध्यक्षपदी शहरातील सामाजिक कार्यकर्ते व शिवसेनेचे धडाडीचे नेते चंद्रकांत उर्फ काका शेळके यांची निवड करण्यात आली. पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, अहिल्यानगर शहर या कार्यक्षेत्रासाठी ओबीसी व्ही. जे. एन. टी. अध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. या निवडीचे पत्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे यांच्या हस्ते शिर्डी येथे झालेल्या ओबीसी व्ही. जे. एन. टी. शिवसेना सेलच्या मेळाव्यामध्ये देण्यात आले. यावेळी कार्यक्रमास प्रदेशाध्यक्ष महिला मराठवाडा प्रमुख मुंडे ताई, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, उत्तर जिल्हा प्रमुख प्रदीपराज भोंडे व सर्व पदाधिकारी उपस्थित होते. चंद्रकांत शेळके हे गेली दहा ते पंधरा वर्षापासून अहिल्यानगर शहरामध्ये सामाजिक कामामध्ये अग्रेसर असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता मदत कक्षाच्या माध्यमातून शहरासह जिल्ह्यातील अनेक रुग्णांना मदत मिळवून दिली आहे. सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असल्याकारणाने पक्षाच्या वतीने त्यांची या पदी निवड करण्यात आली असल्याचं यावेळी सांगण्यात आले.

## घोगरगाव त्रिमूर्ती उच्च माध्यमिक विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

दैनिक झुंजार जनता

**टाकळीभान:** त्रिमूर्ती माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय घोगरगाव तालुका नेवासा शैक्षणिक वर्ष २०२४ /२५ इयत्ता बारावी विज्ञान शाखा १००% निकाल लागला असून प्रथम क्रमांक कुमारी रासकर क्षितिजा संतोष ८३% ,द्वितीय क्रमांक कुमारी भैरट धनिष्ठा शंकर ८२.१७% ,तृतीय क्रमांक कुमारी बहिरट पूजा संभाजी ७४.८३, चतुर्थ कुमारी गीते दिशा नानासाहेब ७३.१७%, पाचवा कुमारी कर्जुले अनुष्का अविदान तसेच कला शाखा निकाल १००% टक्के असून प्रथम क्रमांक पवार अभिषेक नारायण (राज्यस्तरीय खेळाडू कबड्डी) ६७.६७% ,द्वितीय क्रमांक म्हसे गीतांजली रावसाहेब ६४ . ८३%, तृतीय क्रमांक जाधव विकास रामदास (हरियाणा स्टीलर्स गोल्ड मेडलिस्ट कबड्डी २०२४/२५) ६१.६७ %, चतुर्थ शिरसाठ रूपाली शिवाजी ६१%, पाचवा शिरसाट साक्षी नवनाथ ६१ % असे यश विद्यार्थ्यांनी संपादन केले आहे. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक आदरणीय साहेब रावजी घाडगे पाटील यांनी त्रिमूर्तीच्या घोगरगाव संकुलातील बारावीच्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना ,त्यांच्या पालकांना ,मेहनती शिक्षकांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. आपले उज्वल यश भविष्यातील आपल्या पुढील विद्यार्थ्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे असे ते म्हणाले. संस्थेच्या अध्यक्ष सुमतीताई घाडगे पाटील, उपाध्यक्ष स्नेहल चव्हाण, संस्थेचे सचिव मनीष पाटील घाडगे, विद्यालयाचे प्राचार्य संतोष जावळे, टीपीएस विभाग प्रमुख कवठाळे यांनी भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख नितीन साळवे, अर्चना जगताप, संदीप त्रिभुवन, कृष्णा शिंदे, कल्याणी भद्रे, ललिता गारुळे, पूजा ढोकणे, अमोल बहिरट आदी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे वस्तीगृहाचे समन्वयक रवी कोरडे, शिक्षक, शिक्षिका सर्व कर्मचारी सेवक वृंद तसेच पालकांनी अभिनंदन केले आहे.

## 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशानंतर आळंदीमध्ये जल्लोष;

### भाजपने पेढे वाटून साजरा केला आनंदोत्सव



दैनिक झुंजार जनता

**आळंदी :** भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तान आणि पाकिस्तान-व्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशस्वी कारवाईनंतर आळंदी शहरात भारतीय जनता पार्टीतर्फे जल्लोष करण्यात आला. महाद्वार चौकात येथे कार्यकर्त्यांनी एकत्र येत पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या प्रत्युत्तरादाखल भारतीय सैन्याने ७ मे रोजी पहाटे 'ऑपरेशन सिंदूर' राबवले. या कारवाईत लष्कर-ए-तैयबा, जैश-ए-मोहम्मद आणि हिजबुल मुजाहिदीन यांसारख्या दहशतवादी संघटनांच्या प्रशिक्षण केंद्रांसह नऊ ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले. बहावलपूर, मुरीदके, सियालकोट, भिमबर, कोटली आणि मुझफ्फराबाद या ठिकाणी ही कारवाई करण्यात आली. भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाने एकत्रितपणे ही मोहीम यशस्वी केली. या यशस्वी कारवाईनंतर आळंदी शहरातील भाजपा कार्यकर्त्यांनी शहराध्यक्ष किरण येळवंडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाद्वार चौकात एकत्र येत आनंदोत्सव साजरा केला. यावेळी कार्यकर्त्यांनी 'भारत माता की जय' आणि 'भारतीय लष्कराचा विजय असो' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. यावेळी मा.नगरसेवक सागर भोसले, संतोष गावडे, ज्ञानेश्वर बनसोडे, आकाश जोशी, संकेत वाघमारे, भागवत आवटे, वासुदेव तुर्की, प्रीतम किरवे, कृष्णा पालवे, राहुल घोलप, एकनाथ मोरे, राम पवळे, मंगलताई हुंडारे, संगीता कंकाळे हे उपस्थित होते

## बारामतीत खरीप हंगाम पूर्व शेतकरी प्रशिक्षण कार्यशाळा



दैनिक झुंजार जनता

**बारामती :** कृषी विभाग आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती येथे बुधवारी (७ मे) खरीप हंगाम पूर्व शेतकरी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी तुळशीराम चौधरी,तालुका कृषी अधिकारी सुप्रिया बांदल, आगरकर संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ जायभाये, महिला व पुरुष मिळून एकूण १०७ शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते. चौधरी यांच्या हस्ते आत्माअंतर्गत नोंदणीकृत १० शेतकरी बचत गटांना नोंद बुक व गटस्तरीय हिशोब नोंदवही तसेच साहित्याचे वाटप करण्यात आले. बांदल यांनी खरीप हंगाम २०२५ मध्ये कृषी विभागाची सविस्तर भूमिका मांडली.पाणी फाउंडेशनचे डॉ. अविनाश पोळ यांचे ऑनलाइन पद्धतीने शेतकऱ्यांना शेतकरी बचत गट व शेतकरी बचत गटांच्या यशोगाथा याविषयी दुरदृश्यप्रणालीद्वरे मार्गदर्शन केले. जायभाये यांनी सोयाबीनची लागवड पद्धत त्याचबरोबर विविध वान व उत्पादनाची सविस्तर अशा पद्धतीने माहिती दिली. कृषी सहाय्यक फलटण योगेश भोंगळे यांनी ऊस पाचट व्यवस्थापन तसेच ऊस सुपर केन नर्सरीबाबत तसेच सूर्यफूल व करडई या तेलबिया पिकांविषयी निमकर इन्स्टिट्यूट फलटणचे शास्त्रज्ञ. देशपांडे यांनी मार्गदर्शन केले.

## बेपत्ता तरुणाच्या खुनाची उकल, मित्रांनीच केला घात

दैनिक झुंजार जनता

**पुणे :** बेपत्ता पतीच्या तक्रारीत महिलेने पुरवणी जबाब दिला. त्यावरून पोलिसांच्या तपासाला दिशा मिळाली. याबाबत कुणकुण लागताच पतीच्या दोन मित्रांनी पुण्यातून पळ काढला. मात्र, पोलीसांनी त्यांच्या मुसक्या आवळून खून प्रकरणाची उकल केली. वाकड पोलिस ठाण्याच्या हद्दीत थेरगाव परिसरातील ३० वर्षीय तरुण त्याच्या दोन जिवलग मित्रांसह ५ ऑक्टोबर २०२३ रोजी दारू पित बसला होता. त्यावेळी आई-बहिणीवरून शिवीगाळ केल्याने मित्रांनी चाकूने गळ्यावर वार करून तरुणाचा खून केला. त्यानंतर गोधडीत त्याचा मृतदेह गुंडाळून टेम्पोमधून बावधन येथे नेला. तेथे गायकवाड वस्तीमधील महामार्गाखालील एका नाल्यात मृतदेह टाकून दिला. त्यानंतर काही घडलेच नाही, अशा आर्विभावात दोघे मित्र वावरत होते. दरम्यान, तरुण घरी न आल्याने त्याच्या पत्नीने बेपत्ता झाल्याची वाकड पोलिसांकडे ७ ऑक्टोबर २०२३ रोजी तक्रार केली. त्यानंतर पोलिसांनी तरुणाचा शोध सुरू केला. त्याचवेळी तरुणाच्या पत्नीला माहिती मिळाली की, तिचा पती दोन मित्रांसोबत दारू पिण्यासाठी गेला होता. त्यामुळे पत्नीने तिच्या पतीच्या दोन्ही मित्रांच्या घरी जाऊन त्यांच्याकडे चौकशी केली. मात्र, दोन्ही मित्रांनी हात झटकले. तुझ्या पतीबाबत आम्हाला काहीही माहिती नाही, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे महिलेने पुन्हा वाकड पोलिस ठाणे गाठले. तिचा पती त्याच्या दोन मित्रांसोबत दारू पिण्यासाठी गेला होता, असा पुरवणी जबाब तिने ११ ऑक्टोबर २०२३ रोजी पोलिसांना दिला. त्यानंतर पोलिसांच्या तपासाला दिशा मिळाली.दरम्यान, तरुणाच्या बेपत्ता झाल्याची पोलिसांकडे तक्रार दाखल झाल्याबाबत दोन्ही मित्रांना माहिती मिळाली. त्यानंतर ८ ऑक्टोबर २०२३ रोजी तरुणाचे दोन्ही मित्र पुण्यातून पळून जाऊन बीड जिल्ह्यातील आंबेजोगाई या मूळगावी गेले. इकडे पोलिसांकडून दोन्ही मित्रांचा शोध घेण्यात आला. मात्र, ते मिळून येत नव्हते. तत्कालीन पोलिस उपायुक्त डॉ. काकासाहेब डोळे आणि सहायक पोलिस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली वाकड पोलिस ठाण्याचे तत्कालीन वरिष्ठ पोलिस निरीक्षक गणेश जवादवाड यांनी निरीक्षक विठ्ठल साळुंखे, तपास पथकाचे तत्कालीन सहायक निरीक्षक संतोष पाटील, उपनिरीक्षक सचिन चव्हाण यांचे पथक तयार केले. या पथकाने तांत्रिक विश्लेषण करून दोन्ही मित्रांची माहिती मिळवली. ते त्यांच्या मूळगावी असल्याचे समोर आले. वाकड पोलिसांच्या तपास पथकाने आंबेजोगाई येथे जाऊन संशयित दोन्ही मित्रांच्या मुसक्या आवळल्या.

# आळंदीच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही ; कामगार मंत्री आकाश फुंडकर

### संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५०व्या जन्मोत्सवाला कामगार मंत्री आकाश फुंडकर यांची भेट

दैनिक झुंजार जनता

**आळंदी :** संत ज्ञानेश्वर महाराज ७५० वा जन्मोत्सव निमित्त आयोजित ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाला राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सदिच्छा भेट दिली. गाथा मंदिराचे अध्यक्ष हभप पांडुरंग महाराज घुले यांच्या सुश्राव्य किर्तनात मंत्री फुंडकर उपस्थित राहून किर्तन श्रवण केले. यावेळी आळंदी देवस्थानच्या वतीने मंत्री फुंडकर यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी आळंदी देवस्थानचे पदसिद्ध अध्यक्ष महेंद्र महाजन, प्रमुख विश्वस्त योगी निरंजनाथ, पालखी सोहळाप्रमुख डॉ.भावार्थ देखणे, विश्वस्त ॲड.राजेंद्र उमाप, चैतन्य महाराज कबीर, पुरुषोत्तम महाराज पाटील, ॲड.रोहीणी पवार, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर उपस्थित होते. यावेळी फुंडकर यांनी सांगितले की तिर्थक्षेत्र आळंदीचा विकास आरखाड्यासाठी सरकार सकारात्मक असुन त्यामुळे आळंदीच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. वारकरी संप्रदायाच्या पाठबळावरच हे महायुतीचे सरकार आले असून आपण दिलेल्या मार्गदर्शनावर व विचारावर आम्ही चालत आहोत चौंडी येथे झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत आळंदीच्या विकास आरखाड्यावर सकारात्मक चर्चा झाली असून लवकरच हा आरखाडा मार्गी लागण्यासाठी आपल्याला निधीची कमतरता पडु देणार नाही असे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितले.



द • ख • ल

# प्रवरेच्या प्रिती गारुळेची नामांकित कंपनीत निवड



**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या गृह विज्ञान आणि संगणक महिला महाविद्यालयातील संगणक विभागातील मागील वर्षी उत्तीर्ण झालेली विद्यार्थ्यांनी प्रीती गारुळे हिची नुकतेच रिद्धी कार्पोरेट सर्विसेस लिमिटेड अहमदाबाद येथे नामांकित कंपनीमध्ये सॉफ्टवेअर डेव्हलपर्स म्हणून निवड झाली असल्याची माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनुश्री खैरे यांनी दिली. तिला विभाग प्रमुख डॉ. संजय वाणी, डॉ. राजश्री तांबे, ट्रेनिंग आणि प्लेसमेंटचे प्रा. सोन्याबापू मोरे, डॉ. सुरेखा जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील, अभिमत विद्यापीठाचे कुलपते डॉ. राजेंद्र विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे पाटील, सहसचिव भारत घोगरे पाटील, संस्थेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक डॉ. प्रदिप दिघे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनुश्री खैरे आदींनी अभिनंदन केले आहे.

# आखेगाव परिसरात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस

## सोलर पंप व पिकांचे अतोनात नुकसान

**शेवगाव :** तालुक्यातील आखेगाव व परिसरात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला, वादळ भरपूर प्रमाणात झाल्याने विहिरीवरील बसवलेले शेती सोलर पंप वादळामुळे कोलमडून पडले त्यामुळे भरपूर शेतकऱ्यांचे नुकसान झाले, त्याचबरोबर उभे असलेले व




काढणीस आलेले बाजरीचे पीक भुई सपाट झाले, उसाचे पिकाचे देखील नुकसान झाले, बाजरीचे पीक काढणीस आल्याने बाजरीच्या पिकाचे देखील भरपूर प्रमाणामध्ये नुकसान झाले आहे, त्याच बरोबर घरांच्या छतावरील पत्रे देखील काहींचे उडून गेले , अचानक आलेल्या अवकाळी पाऊस वादळी वारे यामुळे शेतकऱ्यांची धांदल उडाली, त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे सोलर पंपाचे जास्तीचे नुकसान झालेले आहे त्यांचे कृषी विभागाने तात्काळ पंचनामे करून दखल घ्यावी अशी आखेगाव व परिसरातील शेतकऱ्यांकडून मागणी होत आहे.

# मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते बुद्धिबळ पटावर चाल देऊन शुभारंभ.

**अहिल्यानगर-** अखिल भारतीय मोतीलालजी फिरोदिया खुल्या बुद्धिबळी स्पर्धेचे दुसऱ्या सत्राचे उद्घाटन अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे व राहुरी कृषी विद्यापीठाचे क्रीडा अधीक्षक प्रा. गायकवाड यांनी पटावर चाल देऊन शुभारंभ करण्यात आले. यावेळी विश्वस्त श्याम कांबळे, प्रकाश गुजराथी, पंच प्रवीण ठाकरे, पवन राणे, शार्दुल टापसे, देवेंद्र ढोकळे, प्रशांत गागरे, अनुराधा बापट, शुभदा ठोंबरे, रोहिणी आडकर आदीसह खेळाडू पालक



मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बुद्धिबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी प्रस्ताविकात संघटने विषयी व स्पर्धेविषयी माहिती सांगितली. यावेळी मनपा आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, बुद्धिबळ खेळामुळे आपल्याला महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यास मदत होते व बुद्धिबळ खेळामुळे बुद्धीला चालना भेटते व जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर खेळाला महत्त्व द्यावे तसेच बुद्धिबळ खेळातून आपले करिअर घडवण्यासाठी निश्चित मदत होते व अहिल्यानगर जिल्ह्यात बुद्धिबळ संघटनेचे कार्य उत्तम असून बुद्धिबळ खेळाडू घडवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहे. या स्पर्धा आयोजनामुळे अनेक आय एम, एफ एम, ग्रँडमास्टर घडले जातील असल्याची भावना व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे यांनी केले तर आभार सुबोध ठोंबरे यांनी मांनले.

# श्रीगोंद्यात गुटखा बंदी नावाला पोहोच मिळतोय गावाला ?

**श्रीगोंदा** ;- राज्यात सगळीकडे प्रतिबंधित असलेला ओला मावा, सुगंधित तंबाखू व पान मसाला खुलेआम विकणाऱ्या श्रीगोंद्यातील दुकानातील किरकोळ मुद्देमाल जप्त करून अन्न व औषध प्रशासन आपली पाठ थोपटून घेत असला तरीही श्रीगोंद्यात अगदी गल्ली बोळात गुटखा सहजपणे उपलब्ध होत आहे, त्यामुळे श्रीगोंद्यात गुटखाबंदी नावाला पण पोहोच मिळतोय साऱ्या गावाला असे म्हणणे काही वावगे ठरणार नाही . राज्य सरकारकडून गुटख्यावर बंदी असली तरीही अगदी सहजपणे कोणत्याही दुकानात अथवा पानटपरीवर गुटखा उपलब्ध होताना दिसत आहे . छोट्या पानटपरीधारकांना माल पुरणाऱ्या डिलर्सवर अगोदर कारवाई करा, असे अन्न व औषध प्रशासनाला नागरिकांनी आवाहन केले आहे.मात्र त्यांना ऐकू येणार का यावर प्रश्न चिन्ह उपलब्ध झाले आहे राज्यात सगळीकडे प्रतिबंधित असलेला ओलामावा, सुगंधित तंबाखू व पान मसाला विक्री केला जात आहे. परंतु याहूनही धक्कादायक बाब म्हणजे या पानटपरीधारकांना ओला मावा बनवण्यासाठी लागणारा कच्चा माल, प्रतिबंधित सुगंधी तंबाखू, पानमसाला हा माल कुठून येतो? याचा सखोल तपास करून हा माल पुरवणारे जिल्हा व तालुका पातळीवरच्या डिलर्स लोकांना आधी पकडायला पाहिजे. हे मोठे मासे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या गळाला का लागत नाहीत ? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. यामागे खरे आरोपी हे छोटे-छोटे पान टपरीधारक नसून यांना माल पुरवणारे लोक हे खरे आरोपी आहेत. लाखो रूपयांची उलाढाल यामधून होत आहे.महाराष्ट्रात बंदी असल्यामुळे शेजारच्या कर्नाटक राज्यातून हा सर्व माल अवैधरित्या महाराष्ट्रात आणला जातो. इथल्या एजंटांमार्फत तो छोट्या-छोट्या पानटपरी धारकां पर्यंत पोहचवला जातो. यामागे काही प्रशासकीय अधिकारी यांचेसुध्दा लागेबांधे असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ज्या पानटपरीधारकांवर कारवाई केल्याचा फार्स केला जातोय, तो केवळ तेवढ्यापुरताच आहे. अवैधरित्या महाराष्ट्रात होणारी आयात रोखली जात नाही. महाराष्ट्रातील अशा मालांचा पुरवठा करणाऱ्या सगळ्या एजंटांच्या मुसक्या आवळल्या जात नाहीत. तोपर्यंत तरी हे प्रकार थांबणार नाहीत कारण अन्न व औषध प्रशासनाला तसेच पोलिसांना याबाबतचे धागेदोरे माहित नसतील का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे मात्र यामध्ये राजकीय आश्रय असल्याची जोरदार चर्चा रंगताना दिसत आहे.

# जॉय शेळके याची महाराष्ट्र फुटबॉल संघासाठी निवड

**अहिल्यानगर -** नारायणपूर, छत्तीसगढ येथे १२ ते २७ मे दरम्यान होणाऱ्या २० वर्षाखालील स्वामी विवेकानंद राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धे साठी महाराष्ट्र राज्याच्या फुटबॉल संघात अहिल्यानगर जिल्हा फुटबॉल संघटनेचा खेळाडू जॉय पंकज शेळके यांची निवड झाली आहे.



एप्रिल महिन्यात पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य फुटबॉल अजिंक्य स्पर्धेमधून राज्यभरातील ४४ खेळाडूंची वेस्ट इंडिया फुटबॉल असोसिएशनद्वारे निवड करण्यात आली होती. या निवडक खेळाडूंची अंतिम निवड चाचणी व प्रशिक्षण २५ एप्रिल ते ५ मे दरम्यान मुंबई येथे पार पडले. या शिबिरातील १८ खेळाडूंची महाराष्ट्र संघासाठी निवड करण्यात आली आहे. जय शेळके अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनद्वारे आयोजित केलेला जिल्हा फुटबॉल लीग मध्ये फिरोदिया शिवाजीयन्स फुटबॉल क्लबचे प्रतिनिधित्व केले आहे. तसेच वरिष्ठ राज्य अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेमध्ये अहिल्यानगर जिल्हा संघाचे प्रतिनिधित्व केले आहे.

अलिबाग जिल्हा रायगड येथे बुधवार (दि.७ मे) पासून पार पाडणाऱ्या महाराष्ट्र राज्य बीच फुटबॉल संघ प्रशिक्षण शिबिर निवड चाचणीसाठी ओम साहेबराव दंडवते (कराळे क्लब हाऊस) व आरमान इकबाल शेख (गुलमोहर स्पोर्ट्स क्लब) यांची देखील निवड झाली आहे. दोन्ही खेळाडू स्पर्धेसाठी रवाना झाले आहेत. या निवड चाचणीसाठी दोघेही खेळाडू खेलो इंडिया बीच गेम २०२५ मध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. सर्व यशस्वी खेळाडूंचे जिल्हा संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालीद सय्यद, अमरजीत सिंग शाही, जोगासिंग मिन्हास, सचिव रोनप फर्नांडिस, सहसचिव प्रदीप जाधव, राजू पाटोळे, विक्टर जोसेफ, खजिनदार रिशपालसिंग परमार यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# केडगाव स्मशानभूमीतील जाळ्या दुरुस्त करून द्या

**अहिल्यानगर :** केडगाव येथील स्मशानभूमीमध्ये बसवण्यात आलेल्या ४ ओट्यावरील जाळ्यांची दूरावस्था झाली असून त्या अक्षरशा तुटलेल्या आहे अंत्यविधी करताना नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे तसेच अंत्यविधी करताना प्रेत ढासळण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे प्रेताची विटंबना होऊ शकते, नागरिकांच्या भावना देखील दुखावल्या जातील तसेच येथे पाण्याची टाकी असून ती नादुरुस्त झाली आहे त्यामुळे पाण्याची समस्या देखील तीव्र झाली आहे बाथरूम मधील नळ ना दुरुस्त झाले असल्यामुळे दशक्रिया विधी व अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांना गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे तरी महापालिका प्रशासनाच्या वतीने



तातडीने केडगाव येथील अमरधाम मधील ओट्यावरील जाळ्या दुरुस्त करून द्याव्यात अशी मागणी स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर यांनी उपयुक्त विजयकुमार मुंडे यांना निवेदनाद्वारे केली आहे.

# तीन दिवसापासून बत्ती गुल, महावितरणाचा भोंगळा कारभार

**मिरी :** पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी परिसरात मागील काही दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू असल्याने सर्वसामान्य नागरकांना व व्यवसायिकांना ऐन उन्हाळ्यातील वाढत्या तापमानाला सामोरे जाताना अंगाची लाही लाही होत आहे.सर्वत्र गेल्या काही दिवसांपासून अवेळी वीज जाण्याने नागरिकांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. उन्हाळा असल्याने सूर्य आग ओकत आहे. पाण्याची पातळी खालावत आहे. तीव्र उष्म्याने अंगाची लाही लाही होत असताना अशातच दिवस दिवस वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे.यात मुख्यत्वेकरून दुपारी व रात्री व सकाळच्या वेळेत वीज खंडीत होण्याचे प्रमाण वाढले असुन महीलांना सकाळी सकाळी वीज खंडीत होत असल्याने पिण्याचे पाणी, घरातील वीजेवर अवलंबून असणार्या कामांचा खेळखंडोबा होत आहे.उन्हाळ्याची तीव्रता जास्त असल्याने पंखे,कूलर यांचा वापर वाढला आहे. अशा स्थितीत दिवसभर वीजपुरवठा बंद पडण्याचे प्रकार झाल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. दिवसभर अगदी दहा-दहा मिनिटांनी विजेचा लपंडाव सुरू होत आहे. सातत्याने खंडित होणारा वीजपुरवठ्यामुळे नागरिक हैराण झाले. मनोरंजनाचीही साधने बंद पडत असून पंखे आणि कुलर बंद पडत असल्याने लहान मुले व ज्येष्ठ नागरिक उकाड्याने हैराण होत आहेत. सर्वात मोठा तोटा हा व्यवसायिकांना सहन करावा लागत आहे उन्हाळ्यामध्ये अनेक छोटे-मोठे व्यवसाय विजेवर अवलंबून आहे तसेच डोंगराळ भाग असल्यामुळे शेतकऱ्यांना जनावरांचा चारा व कुट्टी मशीन चालवण्यासाठी मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. तसेच १ महिन्यापासून पासून तापमानातही वाढ झाल्याने घरात वीजपुरवठा सुरळीत राहणे गरजेचे झाले आहे, यादृष्टीने महावितरण कंपनीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी भावनाही नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

**गेल्या तीन दिवसांपासून आमच्या भागात रात्री , दिवस अवेळी सतत वीज पुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी , विद्यार्थी व व्यवसायिक शाळा इतर सरकारी कार्यालये यांच्या कामकाजात खंड पडत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. यावर तात्काळ उपाय योजना करावी व या समस्यांचे निवारण करावे ही आमची प्रशासन व महावितरण विभागाला विनंती आहे.**

**– भैया भागवत , युवा उद्योजक**

# भगवंत प्राप्तीसाठीच मानवी देहाची निर्मिती : देविदास महाराज म्हस्के

**नेवासा :** भगवंताने अनमोल असलेला नरदेह आपल्याला दिला आहे व त्याला हाताळण्याचे कौशल्य वेद, शास्त्र, पुराण व संत विचारात आहे. त्यामुळे या गोष्टींचा जीवनात आधार घेतला पाहीजे कारण मानवी देहाची निर्मिती ही भगवंत प्राप्तीसाठीच झाली असल्याचे प्रतिपादन ह.भ.प. वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के यांनी केले. सद्गुरू नारायणगिरी महाराज आश्रम, नेवासा बुद्रुक येथे कीर्तन महोत्सवातील सहावे पुष्प गुंफतांना ते बोलत होते.

यावेळी बोलताना देविदास महाराज म्हस्के पुढे म्हणाले की हिंदू धर्म अतिशय सर्वश्रेष्ठ धर्म आहे. भागवत धर्माचे आचरण कुमार अवस्थेतच केले पाहिजे.आपण आज्ञानाने वेद शास्त्राना नाकारल्यामुळे आपण आज दुःख भोगत आहोत.त्यामुळे आपल्याला सुखाची प्राप्ती होत नाही. त्यामुळे आपण आपले जीवन वेदानुसार जगले पाहीजे.

शिष्याने गुरु आज्ञनेचे पालन केले पाहिजे.यातून जीवनाचा उद्धार होतो. जगाची आई ज्ञानोबाराय, संत तुकाराम महाराज, भगवान भाष्यकाराने वेदाला आई म्हंटले आहे. शेतीपासून ते अंतराळापर्यंतचा प्रवास वेदांनी विषद केला आहे.भगवंताच्या प्रसादानेच तुकाराम महाराज वेदवाणी बोलू शकले. महाराज शेवटी म्हणाले की उद्धवजी बाबांचे सांप्रदायिक कार्य आम्ही जवळून पाहिले आहे. वारकरी सांप्रदायाला एक नवी दिशा देण्याचं काम महाराजांनी केलं आहे. शहरी भागातील खूप मोठा समाज महाराजांनी वारकरी सांप्रदायाला जोडला आहे असे गौरोदगार महाराजांनी काढले. किर्तन प्रसंगी दत्तात्रय कांगुणे (मक्तापुर) बाबासाहेब डौले (नेवासा बु श्रश्र) राम कर्जुले (नेवासा फाटा) यांच्या वतीने यावेळी संतपूजन करण्यात आले. नेवासा बुद्रुक येथील रावसाहेब पेचे व एकनाथ डोहाळे सर यांच्या वतीने अल्पोपहार देण्यात आला.तर दुपारी अनिलराव पेचे,श्रीमती इंदिराबाई बोरकर,भानुदास रेडे,बाळकृष्ण जायगुडे व परिवार (नेवासा बू श्रश्र) यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात आला.

नेवासा येथीलउदयकुमार बल्लाळ, राजेंद्र काशिद नेवासा बुद्रुक,बन्सीभाऊ आगळे (नेवासा फाटा) अशोक बत्तासे (रुई राहता) यांच्या वतीने सायंकाळी भाकरी महाप्रसाद देण्यात आला.

# कोकणगाव ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी जयश्री सातपुतेंची बिनविरोध निवड

**मिरजगाव :** कर्जत तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्वाचे समजले जात असलेल्या कोकणगाव ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी जयश्री निलेश सातपुते यांची बिनविरोध निवड झाली आहे. कोकणगाव ग्रामपंचायतीच्या रिक्त झालेल्या सरपंच पदाकरीता गुरूवारी दि.०८ मे रोजी निवडणूक प्रक्रिया मंडळाधिकारी बी.के.शेळके, ग्रामसेविका पी.जी. जोगदंड यांच्या उपस्थितीत पार पडली. सरपंच पदासाठी सौ.जयश्री निलेश सातपुते यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने ही निवडणूक बिनविरोध झाल्याचे जाहीर करण्यात आले. माजी सरपंच महादेव गवारे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने ही निवडणूक घेण्यात आली. यावेळी उपसरपंच संगिता संतराम सुर्यवंशी, ग्रामपंचायत सदस्य संभाजी रोहिदास बोरूडे, महादेव ज्ञानदेव गवारे, वैशाली अशोक गवारे, हिराबाई संभाजी काळंगे यांनी आपली उपस्थिती दाखवली. असून अन्य तीन सदस्य अनुपस्थित होते. नवनिर्वाचित सरपंच जयश्री निलेश सातपुते ह्या विधानपरिषदेचे सभापती ना.प्रा.राम शिंदे यांच्या कट्टर समर्थक असल्याने कोकणगाव ग्रामपंचायत ही भारतीय जनता पार्टीकडे आली आहे. ही सरपंच पदाची निवड माजी सरपंच संभाजी (पंडाराजे) बोरूडे यांच्या नेतृत्वाखाली झाली. यासाठी बिभीषण सुर्यवंशी, युवा नेते अशोक सातपुते व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सरपंच पदाची निवड जाहीर होताच कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करत जोरदार फटाक्यांची आतिषबाजी करुन आनंदोत्सव साजरा केला.

# सर्व सत्तेच्या बाजूने, विरोध बजावण्याचे काम फक्त जनशक्ती विकास आघाडीचे : पोटफोडे

**शेवगाव :** सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नासाठी शेवगाव तालुक्यात आवाज उठवायचे काम कुणी करत असेल तर ती फक्त जनशक्तीच करत आहे. निवडणूक लढवणारे सर्व सत्तेच्या बाजूने आहेत. तालुक्यात विरोधी पक्षाची भूमिका बजावण्याचे काम फक्त जनशक्ती विकास आघाडीच करत असल्याचे प्रतिपादन कार्याध्यक्ष रामजी पोटफोडे यांनी केले.

दि.०७ मे रोजी बोधेगाव येथे जनशक्ती विकास आघाडीच्या 'बोधेगाव शाखा' उद्घाटनाचा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष जनशक्तीचे ज्येष्ठ सदस्य अशोकराव पातकळ हे होते. कार्यक्रमास तालुका कार्यकारणी सदस्य माणिक गर्जे, सचिव भारत लांडे, रामेश्वर पोटभरे, आबासाहेब काकडे, शिवाजी कणसे, अमोल भोंगळे, भागवत भोसले, राजू भांगरे, गुलाब दसपुते, अक्षय भोसले, किरण निकम आदी यावेळी प्रमुख उपस्थितीत होते.



यावेळी बोधेगाव शाखा अध्यक्ष म्हणून सुनील गायके, उपाध्यक्षपदी प्रमोद तांबे, सचिवपदी राहुल गर्जे, कार्याध्यक्षपदी भागवत भोसले तर सदस्य म्हणून गुलाब दसपुते, मच्छिंद्र घोरतळे, राजेंद्र भांगरे, अक्षय भोसले, संजय घोरतळे, ज्ञानेश्वर खेडकर, किरण निकम यांच्या निवडी घोषित करून त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी रामेश्वर पोटभरे, बप्पासाहेब पोटभरे, राहुल गर्जे, आबासाहेब काकडे, भारत लांडे, माणिक गर्जे, शिवाजी कणसे, अमोल भोंगळे, भागवत भोसले, गणेश उगले, आदि यावेळी प्रमुख उपस्थितीत होते. पुढे बोलताना पोटफोडे म्हणाले की, तालुक्यातील सर्वच नेते सध्या सत्ताधारी पक्षात आहेत. त्यांना जनतेच्या प्रश्नाचे काही देणे घेणे उरले नाही. कारण ते सत्येत असल्यामुळे बोलू शकत नाहीत. जनशक्ती ही सतत संघर्ष करणारी संघटना असून ॲड. शिवाजीराव काकडे व हर्षदा काकडे यांनी सतत संघर्ष करून तालुक्याचे विविध प्रश्न चळवळी आंदोलने करून सोडविले आहेत. आमच्यासारखे संघर्ष या तालुक्यात कोणी केलेले नाही. कारण जिकडे सत्ता असते त्या पक्षात आम्ही कधीच गेलो नाही. तर जनतेसाठी सतत विरोधी पक्षाची भूमिका तालुक्याच्या जनतेच्या प्रश्नासाठी पार पाडलेली आहे. त्यामुळे येथून पुढे प्रत्येक गावात सुज्ञ युवक, नागरिकांनी जनशक्ती मध्ये सामील व्हावे असेही कॉ. पोटफोडे यांनी सांगितले.

# पोकलेन व्यवहारात बांधकाम व्यावसायिकाची ३० लाखांची फसवणूक

**अहिल्यानगर :** पोकलेन मशीन व्यवहारात शहरातील बांधकाम व्यावसायिकाची ३० लाखांची फसवणूक झाल्याची घटना घडली. या प्रकरणी मुळचा नंदुरबार येथील रहिवासी व सध्या सुरत (गुजरात) येथील एकावर फसवणुकीचा गुन्हा कोतवाली पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. बांधकाम व्यावसायिक अक्षय राजेंद्र ठाणगे (वय २६, रा. नागापूर एमआयडीसी) यांना व्यवसायासाठी पोकलेन मशीनची गरज असल्याने त्यांच्या ओळखीच्या रमजान अन्सारी यांनी सांगितले की, भरत जगन्नाथ पाटील (रा. भालेरगाव, जि. नंदुरबार, हल्ली रा. सुरत, गुजरात) यांना त्यांचा पोकलेन मशीन विकायचे आहे. त्यानंतर फिर्यादी व त्यांचे भागीदार पंकज मगर यांना पोकलेन मशीन पसंत पडल्याने ता. १६ मे २०२३ रोजी भरत पाटील यांना केडगाव येथील रंगोली हॉटेल येथे विसारापोटी ५ लाख रुपये दिले व बाकीचे २५ लाख दहा दिवसांत देऊन मशीन घेण्याचे ठरले. ठरल्याप्रमाणे २५ मे २०२३ रोजी ठाणगे व मगर यांनी गुजरात येथे जाऊन भरत पाटील यांना २५ लाख रुपये दिले. त्यावेळी भरत पाटील याने आरटीओ रजेवर आहेत, ते आल्यावर मी कंटेनर पाहून मशीन नगरला पाठवतो, असे सांगितल्याने फिर्यादी त्यांच्या सहकाऱ्यांबरोबर अहिल्यानगरला आले. ठाणगे यांनी वारंवार फोन करूनही भरत पाटील याने मशीन पाठवले नाही. त्यानंतर ते मित्रांसह गुजरात येथे भरत पाटील यांच्या घरी गेले असता, भरत पाटील यांनी मी तुम्हाला मशीन देऊ शकत नाही, तुमचे पैसे माझ्या मूळ गावी नंदूरबार येथील बँकेत आहेत. ते मी तुम्हाला लगेच काढून देतो, असे म्हटले. त्यामुळे ठाणगे हे मित्रांसह नंदुरबार येथे जात असताना त्यांना गुजरात पोलिसांनी पकडले. तेव्हा त्यांना कळाले की, भरत पाटील यांच्या पत्नीने पोलिसांना कळविले होते की माझे पती यांना क्रेटा वाहनात उचलून घेऊन अपहरण केले आहे. त्यामुळे गुजरात पोलिसांनी ठाणगे व त्यांच्या मित्रांना पकडले. यावेळी गुजरात पोलिसांनी त्यांचे म्हणणे ऐकून न घेता त्यांच्याविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला. त्यामुळे ठाणगेंसह त्यांचे मित्र ३२ दिवस तुरूंगामध्ये होते.

भरत पाटील यांनी त्यांना पोकलेन मशीन न देता पैसेही माघारी न देऊन विश्वासघात करून फसवणूक केली. त्यामुळे अक्षय ठाणगे यांनी अखेर कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिसांनी भरत पाटील याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# प्रलंबित मागण्यांसाठी कृषी सहायकांचे धरणे आंदोलन

**अहिल्यानगर:** कृषी सहायकांच्या विविध मागण्या पूर्ण करण्याची मागणी करुनही त्याकडे दुर्लक्ष केल्याने राज्यात कृषी सहायकांनी आंदोलन सुरू केले आहे. अहिल्यानगर, अकोला, परभणी, नांदेड, अहिल्यानगर त्याचबरोबर राज्यभरातील कृषी कार्यालयांच्या प्रागणांत बुधवारी (ता.७) कृषी सहायकांनी धरणे आंदोलन केले. अहिल्यानगरला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात कृषी सहायकांनी धरणे आंदोलन केले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, कृषी उपसंचालक सागर गायकवाड, उपविभागीय कृषी अधिकारी दत्तात्रय डमाळे यांनी भेट देऊन कृषी सहायकांशी चर्चा केली. राज्य कृषी सहायक संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष धनराज गुंड, तालुका अध्यक्ष युवराज शिंगटे, सचिव उमेश शेळके, शेखर काळे, शुभम काळे व कृषी सहायक उपस्थित होते.

कृषी सहायक मागण्यांसाठी करत असलेल्या आंदोलनात शुक्रवारी (ता. ९) ऑनलाइन कामकाजावर बहिष्कार टाकणार आहेत.

## कृषी सहायकांच्या मागण्या...

**कृषी सेवक कालावधी रद्द करून नियमित कृषी सहायक पदावर नियुक्ती देण्यात यावी. कृषी सहायकांचे पदनाम बदलून सहायक कृषी अधिकारी करणे. संपूर्ण कामकाज डिजिटल स्वरूपात होत असल्यामुळे लॅपटॉप मिळावा. ग्रामस्तरावर कामकाजासाठी तलाठी, ग्रामसेवकाप्रमाणे मदतनीस मिळावा. निविष्ठा वाटपासंदर्भात सुसूत्रता आणावी, वाहतूक भाड्याची तरतूद करावी.कृषी विभागाच्या आकृतिबंधास तत्काळ मंजुरी द्यावी. कृषी सहायकांच्या पदोन्नतीमधील कुंटितावस्था दूर करावी. 'पोकरा' योजनेमध्ये समूह सहायकांची पदे पूर्वीप्रमाणे भरण्यात यावी पंचनामे व इतर बाबीत महसूल, ग्रामविकास, कृषीच्या जबाबदाऱ्यांबाबत समानता आणावी. सिल्लोड तालुक्यातील कृषी सहायक आत्महत्येबाबत संबंधितांवर कठोर कारवाई करावी. कृषी सहायक संवर्गाच्या आस्थापनाविषयक अडचणीची सोडवणूक करण्यात यावी.**

Printed By, Published By, on behalf of: **Ismail Salim Shaikh,** Printed at Meher Creative Graphics, Chistiya Colony, N-5, Cidco, Tq. & Dist. Aurangabad 431003 (Maharashtra) and published from **Zunjar janta** gulshan nagar, Sillod, Tq. Sillod, Dist. Aurangabad - 431112 (Maharashtra), Editor - **Ismail Salim Shaikh,** Mob:- **8180068180** E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक **इस्माईल सलीम शेख** यांनी मेहेर क्रिएटिव्ह ग्राफिक्स चिश्तिया कॉलोनी -५ सिडको औरंगाबाद - ४३१००१ (महाराष्ट्र) येथे छापून, **झुंजार जनता,** कार्यालय गुलशन नगर सिल्लोड ता. सिल्लोड जिल्हा औरंगाबाद -४३१११२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - **इस्माईल सलीम शेख** संपर्क ८१८००६८१८० E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**